टाइम्स

शनिवार, दि. २८ मार्च २०१५

# पर्यावरण संवर्धन केवळ चर्चासत्रातून नव्हे तर ती एक चळवळ म्हणून उभी राहिली पाहिजे :खा.विनायक राऊत

दोडामार्ग, २७ मार्च (प्रतिनिधी)- माझ्या बालपणातले कोकण आणि आताचं कोकण पाहिलं तर पुन्हा एकदा मागे वळून पहावंस वाटतं. आज अनेक विनाशकारी प्रकल्पामुळे कोकणातं सौंदर्य, पर्यावरण ऱ्हास पावत चाललं आहे. पर्यावरणाचं जतन केलं तरच आपण चांगले जीवन जगू शकतो. यासाठी पर्यावरण संवर्धनासाठी केवळ चर्चासत्रातून नव्हे तर सर्वसामान्यांतून एक चळवळ उभी राहिली पाहिजे असे प्रतिपादन रत्नागिरी-सिंधुदुर्गचे खांस. विनायक राऊत यांनी केले. ते दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सिताराम हळबे महाविद्यालयात भारतीय सामाजिक शास्त्रे अनुसंधान परिषद (आय.सी.एस.आर.आर.) मुंबई पुरस्कृत 'पश्चिम घाट-जागतिक वारसा, पर्यावरण आणि विकास' या विषयावरील दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवनिर्माण शिक्षण संस्थेचे चेअरमन अभिजित हेगशेट्ये हे होते. या चर्चासत्रासाठी केरळ, कर्नाटक, गोवा व महाराष्ट्रातील विविध भागातून पर्यावरण तज्ञ, अभ्यासक, पर्यावरणप्रेमी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित आहेत.

गाडगीळ व कस्तुरीरंगन समितीतबद्दल बोलताना ते पुढे म्हणाले की, विकासाच्या नावाखाली वेगवेगळ्या योजना राबवून कोकणातील निसर्गाची हानी होत आहे. माधव गाडगीळ समितीने अभ्यास करुन पर्यावरणातील जैवविविधतेच्या भवितव्यासाठी अहवाल तयार केला. परंतु इतरांनी त्याचा बाऊ करुन या अहवालासंदर्भात लोकांच्या मनात तिरस्कार कसा निर्माण होईल याबद्दल प्रयत्न केले. कोणत्याही पर्यावरण संवर्धन करणाऱ्या संस्थेने पर्यावरणासाठी सुचविलेल्या चांगल्या गोष्टी सरकारने स्विकारल्या पाहिजे. पर्यावरणाचं संरक्षण करणे हे शासनकर्त्यांचे कर्तव्य असलं पाहिजे. शासनकर्त्यांची भूमिका ही कुटुंबप्रमुखाची असली पाहिजे, पण तसे दिसत नाही. कोकणातलं जीवन हे संपूर्ण निसर्गावरच अवलंबून आहे. उपलब्ध साधनसामुग्रीचा वापर करुन आपल्याला जगलं पाहिजे. इकोसेन्सीटीव्ह, मोरोटोरीयम यामधील सत्य लोकांना समावून सांगितलं पाहिजे. दुष्पपरिणाम टाळण्यासाठी तज्ञांनी सुचविलेले विचार ऐकणारेही हवेत. एकीकडे पर्यावरणाचे रक्षण करायचे व दुसरीकडे व दुसरीकडे घातक प्रकल्प आणावयाचे अशी दुटप्पी धोरणे राबवू नयेत असे मतही त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानावरुन बोलताना अभिजीत हेगशेट्ये म्हणाले की, निसर्गाचा समतोल तुटत चालला आहे. मानवी जीवनाथी निसर्ग हा निगडीत आहे. निसर्गावर आधारीत अनेक रोजगार उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल साधून उपलब्ध साधनांचा वापर करुन रोजगार निर्मिती करावी.

प्रारंभी संस्थेचे सदस्य भाई परमेकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवुन खास.विनायक राऊत यांचा सत्कार करण्यात आला. व्यासपिठावर प्राचार्य डॉ.व्ही.ए. पाटील, प्रा.डॉ.राजेंद्र केरकर, डॉ. हेमंत पेडणेकर, डॉ.एस.ए.ठाकूर, भाई परमेकर, बाबुराव धुरी, सुचन कोरगावकर, विवेकानंद नाईक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.ए. पाटील यांनी केले. यावेळी पर्यावरण तज्ञ, अभ्यासक, पर्यावरणप्रेमी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.पी.डी.गाथाडे यांनी तर आभार प्रा.एस.एन.खडपकर यांनी मानले. त्यानंतर चर्चासत्राचे बीजभाषण प्राचार्य डॉ.हेमंत पेडणेकर यांनी केले. पहिल्या सत्रात पर्यावरण तज्ञ राजेंद्र केरकर यांनी सांस्कृतिक पर्यावरणावर व्याख्यान दिले. तर दुसऱ्या सत्रात केरळचे प्रा.व्ही. सुनिलकुमार यांनी पश्चिम घाट-सांस्कृतिक वारसांचा शोध या विषयावर व्याख्यान दिले. चर्चासत्रात अनेकांनी आपापले शोधनिबंध सादर केले. एका ज्वलंत विषयावर चर्चासत्र आयोजित केल्याबद्दल सर्वांनीच प्रशंसोद्‌गार काढले.

30/3/15